# कृषि पणन विषयक बातम्या : जुलै 2024

छत्रपती संभाजीनगर शहर -जिल्हा TODAY सकाळ दि. 31/07/2024

## अद्रकची आता सरसकट खरेदी-विक्री

### पणनमंत्री अब्दुल सत्तार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांच्यात चर्चा

सिल्लोड, ता. ३० (बातमीदार) : राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्यात मंत्री सत्तार यांच्या संपर्क कार्यालयामध्ये शेतमालासंबंधी मंगळवारी (ता. ३०) चर्चा झाली.

यामध्ये प्रामुख्याने राज्यात परंपरागत पद्धतीने जुने आणि नवीन अशी तफावत न करता अद्रकची सरसकट खरेदी-विक्री करण्यात यावी, असे निर्देश पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी राज्यातील बाजार समितीला दिल्याचे सांगितले. यासाठी तातडीने शासन निर्णय जारी केला जाईल, असे स्पष्ट करत बाजार समिती आणि व्यापाऱ्यांनी याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या बाजार समिती, व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे सत्तार म्हणाले.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी अनिल पवार, कृष्णा साबळे, मनोहर साळुंके, सूर्यभान जाधव, संजय नलावडे, दत्तू घाडगे, विक्रम कदम, शरद खाडे, संतोष तुपे; तसेच माजी उपनगराध्यक्ष अब्दुल समीर, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे, बाजार समितीचे सभापती केशवराव तायडे, नंदकिशोर सहारे, नॅशनल सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, मारुती वराडे, पणन विभागाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सहसंचालक रवींद्र गोसावी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सहसंचालक मुकेश बारहाते यांची उपस्थिती होती.

#### शेतकऱ्यांना असेल स्वातंत्र्य

राज्यातील अद्रक व इतर शेतमाल उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी व शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात माजी खासदार राजू शेट्टी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री सत्तार यांची सिल्लोड येथे भेट घेतली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या मागणीप्रमाणे व शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकऱ्यांचा शेतमाल त्यांनी बांधावर अथवा बाजारात विकावा, यासाठी शेतकऱ्यांना स्वातंत्र्य असेल, असे सत्तार यांनी सांगितले.

#### शासन लवकरच निर्णय घेणार

आम्ही मांडलेल्या विषयावर मंत्री सत्तार यांनी तातडीने दखल घेत याबाबत पणन विभागाच्या अधिकाऱ्यांना तोंडी सूचना दिल्या; तसेच याबाबत तातडीने शासन निर्णय घेऊन त्याची प्रत लवकरच देणार असल्याचा शब्द दिल्याचे राजू शेट्टी यांनी सांगितले.



सिल्लोड : शेतमालासंबंधीच्या विविध प्रश्नांवर चर्चा करताना पणनमंत्री अब्दुल सत्तार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी.

Agrowon, Dt. 30/07/2024

# 'काढणीनंतर योग्य व्यवस्थापन केल्यास पिकाची गुणवत्ता वाढते'

**मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत किसान कनेक्टच्या वतीने भेंडी पिकावर कार्यशाळा**

**नारायणगाव, ता.जुन्नर :** शेतीमाल काढणीनंतर योग्य व्यवस्थापन केल्यास पिकाची गुणवत्ता वाढते व बाजारभावही चांगला मिळतो. उत्पादित केलेल्या शेतीमालाचे मूल्यसंवर्धन करण्यासाठी साठवणूक, प्रतवारी, पॅकिंग, विपणन, प्रक्रिया याकडे लक्ष देणे आवश्यक आहे, असे आवाहन मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे यांनी केले.

मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत किसान कनेक्टच्या वतीने येथील कृषी विज्ञान केंद्रात भेंडी काढणीपश्चात व्यवस्थापन याविषयी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या निवासी प्रशिक्षणास राज्यातील महिला शेतकरी उत्पादक संस्था व मूल्य साखळी गुंतवणूकदार प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी भेंडी काढणीपश्चात व्यवस्थापन याविषयी महिलांना विविध प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी कृषी विज्ञान केंद्राचे प्रभारी वरिष्ठ शास्त्रज्ञ राहुल घाडगे, मॅग्नेट प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे प्रकल्प अधिकारी सचिन खरमाळे, प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे विभागीय प्रकल्प अधिकारी अजय कुदळे, संतोष इंगोले, मनीष मोरे, विषय विशेषज्ञ धनेश पडवळ, संतोष इंगोले, आदित्य माने यांनी महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. बी. टी. पाटील यांनी भेंडीचे मूल्य साखळी व्यवस्थापन व कीडरोग नियंत्रण याबाबत, कष्टकरी राजा शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष नवनाथ गरुड यांनी काढणीपश्चात हाताळणी व व्यवस्थापन पद्धती, विभागीय प्रकल्प अधिकारी अजय कुदळे यांनी व्यवसायातील संधी, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विपणन व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान, आयात निर्यात परवाने व पणन मंडळाच्या योजना याबाबत मार्गदर्शन केले. शेतकरी निवड, जमीन निवड, शेतीमाल खरेदी, पॅकिंग, वितरण आदीबाबत मनीष मोरे यांनी माहिती दिली.

## भेंडी काढणीनंतरचे व्यवस्थापन...

- **काढणी :** भेंडीची काढणी सकाळी किंवा संध्याकाळी करावी. या वेळी भेंडीची फळे ताजी असतात.
- **प्रतवारी :** काढलेली भेंडी सावलीत ठेवावीत. स्वच्छ पाण्याने धुवावीत. खराब फळे वेगळी करावीत.
- **साठवण :** भेंडी थंड आणि कोरड्या ठिकाणी साठवावी. रेफ्रिजरेटरमध्ये भेंडी ५-७ दिवस ताजी राहू शकते.
- **पॅकिंग :** भेंडीची पॅकिंग करण्यासाठी स्वच्छ प्लॅस्टिकच्या पिशव्या किंवा बास्केटचा वापर करावा. पॅकिंग करताना फळे एकमेकांवर घासली जाऊ नयेत.

### भेंडीचे उत्पादनातील बाबी

**जमिनीची निवड :** भेंडी हलक्या ते मध्यम काळ्या जमिनीत चांगली येते. जमीन चांगली निचरा होणारी असावी. जमिनीची पीएच किंमत ६-७ असणे आवश्यक आहे.

**लागवड :** भेंडीची लागवड बियाणे किंवा रोपे लावून केली जाते. बियाणे पेरण्यापूर्वी कीटकनाशकात बुडवावे.

रोपे लावताना दोन रोपातील अंतर ४५-६० सेंटीमीटर असावे.

**खत व्यवस्थापन :** भेंडीला लागणारी खते जमिनीच्या चाचणीनुसार द्यावी. शेणखत, कंपोस्ट खत आणि रासायनिक खते यांचा योग्य प्रमाणात वापर करावा.

**पाणी व्यवस्थापन :** संतुलित पाण्याचा वापर करावा, जमीन ओली ठेवण्याची गरज नाही. पाणी देण्याची पद्धत जमिनीच्या प्रकारानुसार बदलू शकते.

**कीड नियंत्रण:** जैविक कीटकनाशकांचा वापर करून कीटक नियंत्रण करण्याचा प्रयत्न करावा. कीटकनाशकांचा वापर करण्यापूर्वी कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

तरुण भारत
Main Edition | 2024-07-28 | Page-5
epaper.mahamtb.com

# कृषीसाठी धोरणात्मक स्पष्टतेचा अर्थसंकल्प

कृषिरंग
अनिल जवळेकर

भारतीय जनता पक्षाच्या नवीन कारकिर्दीचा पहिला अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. विरोधी पक्षांनी मात्र भाषणात दोनच राज्यांचा उल्लेख असल्याने सरकार वाचवू शकणाऱ्याच साथीदारांच्या राज्यांना झुकते माप सरकारने दिले, म्हणून अर्थसंकल्पाचा विरोध केला. खरे म्हणजे, पूर्वी काँग्रेस मांडत असलेल्या अर्थसंकल्प पद्धतीत व भाजप मांडत असलेल्या अर्थसंकल्प पद्धतीत फरक आहे आणि कदाचित त्यामुळे विरोधी पक्षाचा गोंधळ झाला असावा. पूर्वी अर्थसंकल्पात गत वर्षीचा झालेला खर्च व येत्या वर्षाचा अनुमानित खर्च व त्याचा ऊहापोह करत नवनवीन लोकप्रिय वाटणाऱ्या, पण नेहरू–गांधींच्या नावावरच्या कार्यक्रमांची रेलचेल असलेला अर्थसंकल्प मांडला जायचा. भाजपने ही पद्धती बदलली व समोर उभ्या असलेल्या समस्यांना सामोरे जाता येईल, अशी निश्चित धोरणात्मक भूमिका घेत अर्थसंकल्प मांडण्यास सुरुवात केली. त्यामुळे अर्थमंत्र्यांच्या भाषणात आजकाल आकडेवारी व लोकप्रिय योजना कमी व धोरणात्मक भूमिका जास्त असते, हेच या वर्षीच्या अर्थसंकल्पाबाबतही म्हणता येईल. कृषी क्षेत्रासाठी तर धोरणात्मक दिशा स्पष्ट करणारा हा अर्थसंकल्प आहे, हे निश्चितपणे म्हणता येते.

### कृषी धोरणाची नवी दिशा

आजपर्यंतच्या कृषी धोरणाचा जोर संकरित बी–बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके व पाण्याचा बेसुमार वापर यावर मुख्यत्वे केंद्रित होता. कृषी संशोधनही त्याचसाठी होत होते. त्याचा परिणाम कृषी उत्पादन वाढण्यात झाला असला, तरी कृषी युक्त जमिनीचा क्षय झाला व उत्पादनच नाही तर जमीन, पाणी व हवासुद्धा दूषित झाली. सर्वांचे आरोग्यच धोक्यात आले. औद्योगिकीकरणाने हवामान बदलले व त्याचाही परिणाम कृषी क्षेत्रावर होत गेला. शिवाय, उत्पादनवाढीचा शेतकऱ्यांनाही फारसा फायदा झाला नाही. तो कंगाल व कर्जबाजारी झाला. या धोरणात मूलभूत बदल होणे गरजेचे होते. त्या बदलाचेच सूतोवाच अर्थमंत्र्यांनी यंदाच्या आपल्या अर्थसंकल्पात केले आहे आणि हा मोठा धोरणात्मक बदल म्हणावा लागेल. यामुळे आगामी काळात कृषी क्षेत्राला टिकाऊ विकासाकडे नेता येईल. म्हणूनच या धोरणात्मक बदलाचे स्वागत व्हायला हवे. नुसते कृषी व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा, असे म्हणून चालणार नाही वा प्रत्येक वेळी शेतकऱ्यांना आर्थिक मदत केल्यानेही प्रश्न सुटणार नाहीत. बदलत्या पर्यावरणातून होणाऱ्या नुकसानीपासून कृषी व शेतकऱ्यांना वाचवण्याचे धोरण प्रथम आखायला हवे, तरच बाकी प्रश्नांवर विचार करता येईल, हे येथे लक्षात ठेवले पाहिजे. तेच सरकार करत आहे, हे योग्यच म्हणावे लागेल.



### अर्थसंकल्पातील नवे धोरण

हे सांगण्याची गरज नाही की, भारतीय कृषी अनुसंधान संस्था आजही पारंपरिक पद्धतीने चालते व भारतीय अनुसंधान संस्थाही त्याच पद्धतीने काम करीत असतात. ज्यामध्ये मुख्यतः संकरित बी–बियाणांच्या संशोधनावर भर दिला जातो, ज्यात 'जीएम तंत्रज्ञान विकास'ही येतो. ही संशोधनाची पद्धत बदलणे गरजेचे होते. हाच बदल करण्यासाठी सर्व संशोधन पद्धतींचा नव्याने अभ्यास करण्याचे धोरण सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केले आहे. यात पर्यावरण बदलाला सामोरे जाण्यासाठी आवश्यक त्या बी–बियाणांचा विकास महत्त्वाचा आहे. अशी बियाणेच शेतकऱ्यांना उत्पादनाच्या अनिश्चिततेतून व पीक नुकसानीतून सोडवू शकतील. पर्यावरण आज सर्वार्थाने बदलत आहे, हे सत्य आहे. पण, पर्यावरणीय बदल व त्यातून होणारे कृषीचे नुकसान टाळायचे असेल, तर कृषी संशोधनाची दिशा बदलली पाहिजे. तेच सरकार करत आहे. अर्थसंकल्पात अशा नवीन १०९ प्रकारच्या जातीची बी–बियाणे लवकरच प्रसारित केली जाणार आहेत, हे उल्लेखनीय म्हणावे लागेल.

### निसर्गशेतीला प्रोत्साहन

पर्यावरण बदलाला सामोरे जाताना पर्यावरण दूषित करणाऱ्या कृषी पद्धतींचाही त्याग अपेक्षित आहे व पर्यावरणाला पूरक व साहाय्यक अशा कृषी पद्धतींचा स्वीकार करणेही महत्त्वाचे आहे. निसर्गशेती पद्धती त्यासाठी निश्चित साहाय्यक ठरू शकते. सरकारने आपल्या अर्थसंकल्पात म्हणूनच निसर्गशेतीला प्राधान्य देण्याचे ठरवले आहे. आगामी दोन वर्षांत एक कोटी शेतकरी निसर्गशेतीकडे वळतील, यासाठी प्रयत्न होणार आहेत व 'विकसित भारता'च्या लक्ष्यातील तो एक मोठा टप्पा राहील. रासायनिक खत व कीटकनाशकांशिवाय होणारे कृषी उत्पादन समाज आरोग्यासाठीही उपयोगी ठरेल. त्यासाठी सम्यक उत्पाद प्रमाणित करणारी व्यवस्था सरकारने उभारायचे ठरवले आहे, याचे स्वागत केले पाहिजे.

### डाळी व तेलबिया प्रकल्प उपयोगी

भारत अजूनही तेलबिया व डाळींच्या उत्पादनामध्ये परावलंबी आहे. प्रयत्न करूनही म्हणावे तसे डाळी व तेलबियांच्या उत्पादनात आपल्याला यश मिळाले नाही. या वर्षीच्या अर्थसंकल्पात डाळी व तेलबियांच्या उत्पादनात वाढ व्हावी, म्हणून एक मिशनच हाती घेतले जात आहे, हे उल्लेखनीय म्हणावे लागेल. याचा परिणाम आगामी काही वर्षांत दिसला तर ते स्वागतार्हच!

### भाज्यांचे उत्पादन व पुरवठा साखळी निर्माण

भारताची बाजारपेठ अजूनही शेतकऱ्यांना मदतीची होत नाही आणि त्यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठे नुकसान सहन करावे लागते. हे नुकसान भाज्यांसारख्या नाशवंत उत्पादनाबाबतीत विशेष घडते. यासाठी सरकारने या अर्थसंकल्पात विशेष प्रयत्न करण्याचे ठरवले आहे. ते आवश्यकच आहे. अशी पुरवठा साखळी उत्पादनाच्या बाजारपेठेजवळ उत्पादन 'क्लस्टर' स्वरूपात निर्माण करण्याचा प्रयत्न होणार आहे. हे सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक संघ व स्टार्टअप वगैरेंना प्रोत्साहन देऊन केले जाईल. याचा फायदा शेतकऱ्यांना व ग्रामीण भागाला मिळेल हे निश्चित.

> *यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाची रोजगार आणि उद्योगधंद्यांच्या दृष्टिकोनातून प्रामुख्याने चर्चा होत असली, तरी कृषी क्षेत्राच्या अनुषंगानेही अर्थमंत्र्यांनी केलेल्या घोषणा तितक्याच उल्लेखनीय ठराव्या. केंद्र सरकारने कृषी क्षेत्रासाठी नैसर्गिक शेतीला दिलेले प्रोत्साहन आणि एकूणच शेतीसाठी डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीला दिलेली चालना याचे परिणाम निश्चितच भविष्यात दिसून येतील. त्यानिमित्ताने कृषीसाठी धोरणात्मक स्पष्टतेच्या या अर्थसंकल्पाविषयी...*

### कृषीसाठी डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर

आज अवघे जगच डिजिटल झाले आहे. डिजिटल तंत्रज्ञान जसजसे विकसित होत आहे, त्याचा वापरही वेगवेगळ्या क्षेत्रांत वाढत आहे. कृषी क्षेत्राला तर याची गरज तर खूपच आहे. त्यामुळे कृषी आणि ग्रामीण भारतात या तंत्रज्ञानाचा वापर करून लाभ घेणे उपयोगाचे आहे. आज मोबाईलचा वापर प्रत्येक जण करत आहे. अगदी शेतकरीसुद्धा करत आहे. हवामानाचा अंदाज, बी–बियाणे व कीटकनाशक वगैरेंची माहिती व उपलब्धता, पीकस्थिती व येणाऱ्या अडचणींवर मात करण्याचे उपाय, उत्पादन विक्रीसाठी आवश्यक बाजारपेठेची माहिती व ऑनलाईन विक्रीची व्यवस्था, विकाच्या किमती, पीक विमा व त्यासाठी आवश्यक पीक सर्वेची माहिती, सरकारी व इतर मदत वगैरे अनेक प्रकारची माहिती आज घरबसल्या शेतकऱ्यांना मिळू शकते व ती मिळाली पाहिजे. ही माहिती कृषी उत्पादन, उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यास मदत होऊ शकते. शेतकऱ्यांना आपल्या पिकाची वाजवी किंमत मिळवून देण्यासाठीही हे उपयोगी होऊ शकते. तसेच त्यांना सरकारी योजनांचा लाभही सहज घेता येईल. यासंदर्भात कृषी क्षेत्रात डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरची गरज खूप मोठी आहे. आता सरकारने येत्या तीन वर्षांत, राज्य सरकारच्या साहाय्याने का होईना, या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर उभे करायचे ठरवले आहे, हा एक उत्तम निर्णय म्हणावा लागेल. यामुळे शेतजमिनीच्या नोंदीसुद्धा व्यवस्थित होण्याला मदत होईल व त्याचाही फायदा शेतकऱ्यांना होईल.

### अन्य योजनाही उपयोगी

अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांकडून सर्व गोष्टी सांगितल्या जात नाहीत, याचा अर्थ बाकी योजनाच नाहीत, असे नाही. कृषी व शेतकऱ्यांच्या अनेक समस्या सरकार विविध व विशेष योजनांद्वारे सोडवण्याचा प्रयत्न करत असते. यात कृषी विकासाला उपयुक्त अशा योजना जशा आहेत, तशाच शेतकरी व गरीबवर्गाला प्रत्यक्ष आर्थिक मदत करणाऱ्या योजनाही आहेत. त्या सर्व योजना चालूच राहणार आहेत व त्याचा लाभ कृषी क्षेत्र व शेतकऱ्यांना होणारच आहे. कृषी विकासासाठी चालू असलेली 'राष्ट्रीय कृषी विकास योजना', 'कृषोन्नती योजना' अशी कृषीविकासात साहाय्यक ठरत आहे, तसेच 'पीक विमा योजना', 'किसान सन्मान निधी', 'इंटरेस्ट सबव्हेन्शन स्कीम', 'मार्केट इंटरव्हेन्शन' आणि भाव संरक्षण, 'अन्नदाता आय संरक्षण योजना', 'किसान मानधन योजना', 'शेतकरी उत्पादक संघ' (एफपीओ) साठी मदत, कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड मदत, स्टार्टअपसाठी 'ब्लेन्डेड कॅपिटल सपोर्ट', ड्रोन भाड्याने देण्याची योजना, 'नॅशनल बी कीपिंग हनी मिशन', 'नॅच्युरल फार्मिंग मिशन' वगैरे अनेक योजना शेतकऱ्यांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत करत आहेत. या योजना चालू आहेत व चालूच असणार आहेत. शेतकरी व कृषी क्षेत्राला याचा लाभ होत आहे, हे मान्य करावे लागते.

### भारतीय कृषी क्षेत्रासमोरील प्रश्न

भारतीय शेती ही आजही निसर्गावर अवलंबून आहे व त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे, येथील शेतकरी हा लहान शेतकरी आहे. ज्याच्याकडे साधन–संपत्ती व उत्पन्नाची कमी आहे. त्यामुळे कृषी पद्धतीत तो सरकारी मदतीशिवाय बदल करू शकत नाही. आजपर्यंतची व्यवस्था ही कृषी उत्पादन वाढूनही शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या समृद्ध करू शकलेली नाही. आता तर निसर्गानेच साथ सोडली आहे. त्यामुळे सरकारला काही मूलभूत धोरणे बदलणे गरजेचे आहे व त्यात बदलत्या निसर्गाला अनुकूल अशी पीकव्यवस्था व कृषीपद्धती मुख्य राहील. या अर्थसंकल्पात सरकारने तसा धोरणात्मक बदल करण्याचे ठरवले आहे व ते स्वागतार्ह आहे. अर्थात, ही सुरुवात म्हणावी लागेल. कृषी क्षेत्राचे अनेक पैलू आहेत व त्यानुसार समस्याही आहेत. येत्या काळात कृषीसंदर्भातील आतापर्यंत अमलात असलेली अनेक धोरणे बदलावी लागतील, मग ती 'किमान आधारभूत किंमत' (एमएसपी) संबंधित असो की खत सबसिडीसंबंधित. सरकार तेही धैर्य दाखवेल ही अपेक्षा, या अर्थसंकल्पाने दिली आहे एवढे निश्चित म्हणता येते.

aniljavalekar@gmail.com

Agrowon, Dt. 28/07/2024

# काजू मंडळाला २ कोटी ४० लाख

अॅग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील काजू फळपीक विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य काजू मंडळाला दोन कोटी ४० लाख रुपयांचा निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच काजू मंडळावर काजू क्षेत्रातील स्वतंत्र संचालक म्हणून डॉ. परशराम पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कोकण, आजरा, चंदगड आणि राधानगरी तालुक्यांसाठी काजू फळ पीक विकास योजनेंतर्गत स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य काजू महामंडळासाठी यंदाच्या आर्थिक वर्षासाठी १२ कोटी रुपये भागभांडवल स्वरूपात अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. यापैकी २ कोटी रुपयांची रक्कम वितरणास मान्यता दिली आहे. वास्तविक भांडवली खर्चाकरिता ५० कोटी रुपयांना या आधीच मान्यता दिली आहे. मात्र केवळ १२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

काजू मंडळाचे रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि चंदगड येथे विभागीय कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. मात्र राज्यातील काजूचे उत्पादन रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात जास्त होते. सिंधुदूर्गातील वेंगुर्ला येथे काजू संशोधन केंद्रही आहे. त्यामुळे येथेच मुख्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पणन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली हे महामंडळ कार्यरत असून मुख्य कार्यकारी अधिकारी या मंडळाचे सदस्य सचिव आहेत. स्वतंत्र संचालकांमध्ये काजू प्रक्रिया उद्योजक दोन, सहकारी काजू प्रक्रिया प्रकल्प महासंघाचा प्रतिनिधी आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ यांचा एक प्रतिनिधी असे चार सदस्य नेमण्यात येणार होते. यापैकी डॉ. पाटील यांची नियुक्ती केली आहे.

मुंबई तरुण भारत

Main Edition | 2024-07-27 | Page- 2
epaper.mahamtb.con

# जेएनपीटीत पहिली कृषी-निर्यात सुविधा

**पनवेल, दि. २६ : प्रतिनिधी**

भारताची कृषी-निर्यात आणि आयातविषयक क्षमता यांमध्ये अधिक वाढ करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण कार्य हाती घेत केंद्रीय बंदरे, नौवहन तसेच जलमार्गमंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी मुंबईत जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या (जेएनपीए) सुमारे २८४.१९ कोटी रुपये खर्चून 'जेएनपीए येथे पीपीपी अर्थात सार्वजनिक-खासगी तत्वावरील भागीदारीतून निर्यात-आयात आणि देशांतर्गत कृषी माल आधारित प्रक्रिया आणि साठवण सुविधेचा विकास करण्यासाठीच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे.



जवाहरलाल नेहरू बंदरात सुमारे ६७ हजार, ४२२ चौ.मी. क्षेत्रावर 'जेएनपीए' सर्वसमावेशक अत्याधुनिक कृषी सुविधा उभारणार आहे. या अग्रणी सुविधेमुळे लॉजिस्टिक्ससंबंधी अकार्यक्षमतेवर उपाययोजना केली जाईल, वेगवेगळ्या ठिकाणी कृषी मालाची हाताळणी होणे कमी करता येईल. तसेच कृषी उत्पादनांची टिकण्याची क्षमता वाढवता येईल. यातून कृषीसंबंधित उत्पादनांना अधिक चांगला भाव, रोजगारनिर्मिती तसेच कृषिक्षेत्राची एकंदर वाढ हे लाभ मिळणे अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे शेतकरी तसेच निर्यातदार यांचे सक्षमीकरण होईल. मागणीला चालना मिळेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालय (एमओपीएसडब्ल्यू) कृषी-निर्यात क्षमता वाढवण्यासोबतच शेतकऱ्यांना आणि ग्रामीण समुदायांना मदतदेखील करण्यासाठी सशक्त पायाभूत सुविधा उभारणीप्रति कटिबद्ध आहे. महाराष्ट्रातील जेएनपीए हे देशातील पहिले संपूर्णतः पीपीपी तत्वावर परिचालन आणि १०० टक्के स्वतःच्या मालकीची जागा असणारे एक संपन्न बंदर आहे.

Powered by iDocuments

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

# काजू बी अनुदानासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी काजू हंगाम २०२४ करिता काजू बी शासन अनुदान योजना सुरू करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक काजू उत्पादक शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य काजू मंडळाकडे ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम यांनी केले आहे.

कोकण विभाग व कोल्हापूर जिल्ह्यामधील काजू उत्पादक शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या मुख्य किंवा विभागीय कार्यालय, तर अन्य भागांतील काजू उत्पादक शेतकऱ्यांनी राज्य कृषी पणन मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत, असेही त्यांनी कळविले आहे.

अर्जासोबत काजू बी विक्री पावती, सात-बारा उतारा, आधार संलग्नित बँक खाते, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे सादर करावीत. राज्यातील काजू उत्पादक या योजनेचे लाभार्थी असणार आहेत. याकरिता काजू उत्पादकांचे सात-बारा उताऱ्यावर काजू लागवडीखालील क्षेत्र, झाडांची नोंद असावी. शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षम काजूच्या झाडांची संख्या व त्यापासून प्राप्त काजू बी उत्पादन हे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून घ्यावे. उत्पादक शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीकडील नोंदणीकृत परवानाधारक काजू व्यापारी, नोंदणीकृत सहकारी संस्था, खरेदी-विक्री संघ व नोंदणीकृत काजू प्रक्रियादार यांना काजू बी विक्री करावी. काजू उत्पादक शेतकऱ्याने विक्री केलेल्या काजूच्या विक्री पावतीवर नोंदणीकृत खरेदीदाराचा जीएसटी क्रमांक, शेतकऱ्याचे संपूर्ण नाव, पत्ता नमूद असावे.

- **महाराष्ट्र राज्य काजू मंडळाचे अधिकारी कदम यांचे आवाहन**



## प्रतिकिलो दहा रुपये अनुदान

शेतकऱ्यांना प्रतिकिलो दहा रुपये अनुदान आहे. तसेच, शेतकऱ्यांचा किमान ५० किलो आणि जास्तीत जास्त दोन हजार किलो काजू बियांसाठी अनुदान मर्यादा असल्याची माहिती मंडळाचे रत्नागिरी विभागीय कार्यालयाचे सहायक सरव्यवस्थापक मिलिंद जोशी यांनी सांगितले.

Pudhari, Dt. 27/07/2024

# मॅग्रेट आणि केंद्रीय लिंबू संशोधन संस्थेत सामंजस्य करार

## संत्रा, मोसंबी, लिंबू, पिकांचे काम करणाऱ्या शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्थांना अधिक फायद्याची अपेक्षा

पुणे : पुढारी वृत्तसेवा
राज्य सरकारच्या आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित पुण्यातील महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पामध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या (आयसीएआर) नागपूर येथील केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्थेत मंगळवारी (दि. २३) नागपूर येथे सामंजस्य करार संपन्न झाला. या करारामुळे संत्रा, मोसंबी आणि लिंबू या पिकांमध्ये कामकाज करणाऱ्या शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्थांना अधिक फायदा होण्याची अपेक्षा आहे.

**नागपूर येथे करण्यात आला करार**

या करारावर मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे आणि केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्थेचे संचालक डॉ. दिलीप घोष यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी मॅग्नेट प्रकल्पाचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, नागपूर प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे विभागीय उपप्रकल्प संचालक अजय कडू आणि अधिकारी-शास्त्रज्ज्ञ उपस्थित होते. मॅग्नेट संस्थेचे अध्यक्ष आणि राज्याचे सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनूप कुमार यांच्या विशेष प्रयत्नामुळे हा सामंजस्य करार झाल्याचे विनायक कोकरे यांनी सांगितले. तसेच लिंबूवर्गीय संस्थेत नवीन वाणांचा विकास, गुणवत्तापूर्ण उत्पादन, तंत्रज्ञान विकसन, विस्तारकार्य, काढणीपश्चात व्यवस्थापन, मूल्यवर्धन आदींसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. डॉ. दिलीप घोष म्हणाले, मॅग्नेट प्रकल्पासोबत काम करण्यास उत्सुक असून, भविष्यात त्यांच्या सहकार्याने लिंबूवर्गीय शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविणार आहोत.



मॅग्नेट आणि केंद्रीय लिंबू संशोधन संस्थेत सामंजस्य करार प्रसंगी विनायक कोकरे, डॉ. दिलीप घोष, डॉ. अमोल यादव.

Agrowon, Dt. 27/07/2024

# देशातील पहिली कृषी-निर्यात सुविधा 'जेएनपीए'त उभारणार

## केंद्र सरकारकडून २८४.१९ कोटींच्या प्रकल्पास मंजुरी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** भारताची कृषी निर्यात आणि आयातविषयक क्षमता यामध्ये अधिक वाढ करण्यासाठी मुंबईत जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या (जेएनपीए) सुमारे २८४.१९ कोटी रुपये खर्चून 'जेएनपीए येथे सार्वजनिक-खासगी (पीपीपी) तत्त्वावरील भागीदारीतून निर्यात-आयात आणि देशांतर्गत कृषी माल आधारित प्रक्रिया आणि साठवण सुविधेचा विकास' करण्यासाठीच्या प्रकल्पाला केंद्रीय बंदरे व जलवाहतूक मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी मंजुरी दिली आहे.



जेएनपीए या बंदरात सुमारे ६७ हजार ४२२ चौरस मीटर क्षेत्रावर सर्वसमावेशक अत्याधुनिक कृषी सुविधा उभारणार आहे. या सुविधेमुळे लॉजिस्टिक्ससंबंधी अकार्यक्षमतेवर उपाययोजना केली जाईल,

पान ४ वर »

### ...या निर्यातीस अधिक फायदा

- बिगर-बासमती तांदूळ, मका, मसाल्यांची पिके, कांदा आणि गहू.
- गोठवलेले मांस उत्पादन, मत्स्य उत्पादने.

# देशातील पहिली कृषी-निर्यात सुविधा 'जेएनपीए'त उभारणार

» पान १ वरून

वेगवेगळ्या ठिकाणी कृषी मालाची थेट हाताळणी होणे कमी करता येईल आणि कृषी उत्पादनांची टिकवण क्षमता वाढवता येणार आहे. याविषयी बोलताना मंत्री सोनोवाल म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्रीय बंदरे व जलवाहतूक मंत्रालयाने कृषी निर्यात क्षमता वाढविण्यासोबतच शेतकऱ्यांना आणि ग्रामीण समुदायांना मदत देखील करण्यासाठी सशक्त पायाभूत सुविधा उभारणीप्रती कटिबद्ध आहे. जेएनपीटी येथे या सर्वसमावेशक सुविधेच्या उभारणीमुळे लॉजिस्टिक्स प्रक्रिया सुरळीत होईल, नाशिवंत शेतीमालाची हानी कमी होईल आणि कृषी उत्पादनांना अधिक चांगला भाव मिळवता येईल. भारताच्या कृषी क्षेत्राला चालना देण्याच्या आणि आपल्या शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याच्या दिशेने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.''

महाराष्ट्रातील जेएनपीटी हे देशातील पहिले संपूर्णतः पीपीपी तत्त्वावर परिचालन आणि १०० टक्के स्वतःच्या मालकीची जागा असणारे बंदर आहे. पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे एमओपीएसडब्ल्यूतर्फे एकूण ७६,२२० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह देशातील सर्वांत मोठे बंदर विकसित करण्यात येत आहे. वाढवण येथील हे बंदर संपूर्ण वर्षभर कार्यरत असणारे ग्रीनफिल्ड डीप ड्राफ्ट प्रकारचे प्रमुख बंदर म्हणून विकसित केले जाईल.

सागरमाला योजनेअंतर्गत २३२ कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीतून महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत ७९० कोटी रुपये मूल्याचे १६ प्रकल्प उभारून पूर्ण झाले आहेत. सद्यःस्थितीला १,११५ कोटी रुपये खर्चाच्या १४ अतिरिक्त प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर असून त्यासाठी याच योजनेतून ५६१ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

### साठवण क्षमता वाढणार

छोट्या निर्यातदारांना या बंदरस्थित सुविधेचा अधिक लाभ होणार आहे. त्यांच्याकरिताच्या लॉजिस्टिक्स क्षमता, कंटेनर्सचे बुकिंग, शीत साखळी लॉजिस्टिक्स तसेच निर्यातसंबंधी व्यवहार यांच्यात सुधारणा होईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अपेक्षित वाढीव निर्यात क्षमतेमध्ये १,८०० टन गोठवलेल्या स्वरूपातील साठवण,

नवराष्ट्र

# शेतकऱ्यांनी मॅग्नेट प्रकल्पाचा लाभ घ्यावा

## दिनेश डागा : केळी पिकाबाबत प्रशिक्षण वर्ग



**अकोट,** (ता. प्र.). सहकार व पणन विभागांतर्गत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे व कृषी विभाग अकोलाच्या विद्यमाने 'केळी : उत्तम कृषी पद्धती' प्रशिक्षण वर्गाचे आयोजन बुधवारी (दि. 24) कांताई मंगल कार्यालय पणज, ता. अकोट येथे करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन मॅग्नेटचे प्रकल्प उपसंचालक दिनेश डागा यांनी केले.

कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर डॉ. एच. पी. सिंग, मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप, डॉ. के. बी. पाटील, तालुका कृषी अधिकारी सुशांत शिंदे, कृभकोचे विभागीय व्यवस्थापक जितेंद्र भामरे, डॉ. नरेंद्र रामटेके, डॉ. गजानन पाचघरे, मयुरी मिसाळ, निखील धानोरकर, सरपंच अक्षय कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रकल्प उपसंचालक डागा यांनी मॅग्नेट प्रकल्पाची सविस्तर माहिती शेतकऱ्यांनी दिली. डॉ. सिंग यांनी प्रशिक्षण कार्यक्रमास शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल तर हेमंत जगताप यांनी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाला अमरावती विभागामध्ये केळी पीक प्रशिक्षण घेण्यासाठी मॅग्नेट प्रकल्पाने संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रकल्पाचे आभार मानले.

दरम्यान, उपस्थित मान्यवरांनी केळी पिकाची तंत्रशुद्ध लागवड, पिकाचे काढणी पश्चात तंत्रज्ञान, पिकाचे खत व पाणी व्यवस्थापन व केळी पिकाचे निर्यात व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. लिंग समानता व सामाजिक समावेषण याविषयी मयुरी मिसाळ यांनी सखोल माहिती दिली.

कार्यक्रमासाठी जवळपास 350 हून अधिक शेतकरी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, एमसीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे, प्रकल्प उपसंचालक डॉ. अमोल यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. संचालन हेमंत जगताप यांनी केले. कार्यक्रमासाठी जी. बी. निगुडे व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Akola Plus Edition Edition
Jul 26, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com

लोकमत

# केळी- उत्तम कृषी पद्धती प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोट** : सहकार व पणन विभाग अंतर्गत आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प अंतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे व कृषी विभाग अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने केळी-उत्तम कृषी पद्धती प्रशिक्षण वर्गाचे आयोजन पणज येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाप्रसंगी आयसीएआर माजी डीडीजी डॉ. एच. पी. सिंग, मॅग्नेट प्रकल्प उपसंचालक दिनेश डागा, मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप, डॉ. के. बी. पाटील, तालुका कृषी अधिकारी सुशांत शिंदे, जितेंद्र भामरे, डॉ. नरेंद्र रामटेके, डॉ. गजानन पाचघरे, मयुरी मिसाळ, निखिल धानोरकर आदी उपस्थित होते. आयोजन मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, मिलिंद आकरे व डॉ. अमोल यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. संचालन व आभार प्रदर्शन हेमंत जगताप यांनी केले. यशस्वितेसाठी कृषी विभाग अकोट, अकोला व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे यांच्या अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

Hello Akola Gramin
Page No. 2 Jul 26, 2024
Powered by: erelego.com

अॅग्रोवन

# शेतकऱ्यांनी 'मॅग्नेट' प्रकल्पाचा लाभ घ्यावा : डागा

**अकोला :** जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी 'मॅग्नेट' प्रकल्पातील उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्रकल्पाचे उपसंचालक दिनेश डागा (अमरावती) यांनी केले.

सहकार व पणन विभागातंर्गत आशियायी विकास बँक अर्थसहाय्यित 'महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पां'तर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे व अकोला कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'केळी- उत्तम कृषी पद्धती प्रशिक्षण' वर्गाचे आयोजन पणज (ता. अकोट) येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर माजी संचालक डॉ. एच. पी.सिंग (दिल्ली), श्री. डागा, मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप (महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, साखर संकुल, पुणे), जैन इरिगेशनचे डॉ. के बी. पाटील, तालुका कृषी अधिकारी सुशांत शिंदे, कृभकोचे विभागीय व्यवस्थापक जितेंद्र भामरे, 'पंदेकृवि'चे सहायक प्रा. डॉ. नरेंद्र रामटेके, डॉ. गजानन पाचघरे, श्रीमती मयुरी मिसाळ, निखिल धानोरकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. लिंग समानता व सामाजिक समावेषण याविषयी श्रीमती मिसाळ यांनी माहिती दिली. हेमंत जगताप यांनी सूत्रसंचालन करीत आभार मानले.

Akola, Main
26/07/2024 Page No. 5

Kolhapur, Lalkar, Dt. 25/07/2024

# ललकार

# काजु उत्पादक शेतकऱ्यांसाठी काजु बी शासन अनुदान योजना

## ३१ ऑगस्ट पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

कोल्हापूर, दि. २४ (वार्ताहर) - राज्यातील काजु उत्पादक शेतक-यांना काजु बी साठी शासनाकडुन वित्तिय सहाय्य उपलब्ध करुन दिल्यास, काजू उत्पादक शेतक-यांना योग्य भाव मिळण्यास मदत होईल, ही बाब विचारात घेवुन सन २०२४ च्या काजु हंगामासाठी काजु उत्पादनाकरिता शासनाने राज्यातील काजु उत्पादक शेतक-यांसाठी काजु बी शासन अनुदान योजना कार्यान्वीत केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणुन महाराष्ट्र राज्य काजु मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी काजू उत्पादक शेतकऱ्यांनी काजू बी विक्री पावती, ७/१२ उतारा, आधार संलग्नित बचत बँक खात्याचा क्रमांकासह तपशील, कृषी विभागाच्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र इ. तपशीलासह अर्ज महाराष्ट्र राज्य काजु मंडळाकडे ३१ ऑगस्ट २०२४ पुर्वी सादर करावेत, असे आवाहन मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम यांनी केले आहे. राज्यातील काजु उत्पादक या योजनेचे लाभार्थी असतील. त्यासाठी काजु उत्पादक शेतक-यांच्या ७/१२ वर काजु लागवडी खालील क्षेत्र / झाडांची नोंद असणे आवश्यक आहे. शेतक-यांच्या उत्पादनक्षम काजुच्या झाडांची संख्या व त्यापासुन प्राप्त काजु बी उत्पादन हे संबंधित कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. काजू उत्पादक शेतकऱ्यांनी राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीकडील नोंदणीकृत परवानाधारक काजू व्यापारी, नोंदणीकृत सहकारी संस्था, खरेदी-विक्री संघ व नोंदणीकृत काजू प्रक्रियादार यांना काजू बीची विक्री केलेली असणे आवश्यक आहे. काजू उत्पादक शेतकऱ्याने विक्री केलेल्या काजूच्या विक्री पावतीवर उपरोक्त नमूद नोंदणीकृत खरेदीदाराचा जीएसटी क्रमांक, शेतकऱ्याचे संपूर्ण नाव, पत्ता असणे आवश्यक आहे.

■ मंगळवार । दि. २३ जुलै २०२४ ■ PRABHAAT । Press Registration No. 1639/1957, Year 93, Issue No. : 203 पाने १६ (गुडमॉर्निंगसह) किंमत ₹ ५/- ★★★

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com



पत्रकार -मंगेश रत्नाकर 9096931066

# कृषीमूल्य साखळीतील घटकांमध्ये योगदान द्या

## विनायक कोकरे यांचे महिलांना आवाहन : नारायणगावात भेंडी काढणीपश्चात व्यवस्थापन प्रशिक्षण

**नारायणगाव, दि. २२ (वार्ताहर)** - महिलांनी कृषीमूल्य साखळीतील विविध घटकांमध्ये योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन प्रकल्प संचालक विनायक कोकरे यांनी केले.

सेंटर ऑफ एक्सेलेन्स संस्था कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव आणि किसान कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत आयोजित भेंडी काढणी पश्चात व्यवस्थापन प्रशिक्षणात कोकरे बोलत होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे प्रभारी वरिष्ठ शास्त्रज्ञ व



प्रमुख राहुल घाडगे, मॅग्नेट प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे प्रकल्प अधिकारी सचिन खरमाळे, विभागीय प्रकल्प अधिकारी अजय कुदळे, धनेश पडवळ, संतोष इंगोले, आदित्य माने आदी उपस्थित होते. प्रशिक्षणास राज्यातील शेतकरी उत्पादक संस्था व मूल्य साखळी गुंतवणूकदारांचे ४८ प्रतिनिधी उपस्थित होते.

विनायक कोकरे यांनी मॅग्नेट प्रकल्पाचे फलोत्पादनातील महत्त्व आणि त्यातील विविध संधी यांवर मार्गदर्शन केले. तसेच साठवणूक, प्रतवारी, पॅकिंग, विपणन, प्रक्रिया आणि मूल्य संवर्धन यासारख्या क्षेत्रात महिलांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. प्रशिक्षणात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. अतिरिक्त प्रकल्प संचालक, डॉ. अमोल यादव यांनी मॅग्नेट प्रकल्पामधील नवीन व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानास ६० टक्के पर्यंत अनुदान, खेळते भांडवल व मध्य मुदत कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य मिळत असल्याने शेतकरी, उत्पादक संस्थानी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. बी. टी. पाटील व्हेजीटेबल ब्रीडर यांनी भेंडीचे मूल्य साखळी व्यवस्थापन व कीड व रोग नियंत्रण याबाबत मार्गदर्शन केले. नवनाथ गरुड यांनी भेंडी काढणी पश्चात हाताळणी व व्यवस्थापन पध्दती तसेच देशांतर्गत विपणन करताना आलेले अनुभव व आठवडी बाजार याबाबत अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल घाडगे, प्रस्तावना सचिन खरमाळे यांनी तर धनेश पडवळ यांनी आभार मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# कृषी मूल्यसाखळीत महिलांनी योगदान द्यावे

## विनायक कोकरे यांचे आवाहन; नारायणगावला भेंडी काढणीपश्चात व्यवस्थापन प्रशिक्षण

**नारायणगाव : प्रतिनिधी**

महिलांनी कृषी मूल्यसाखळीतील विविध घटकांमध्ये योगदान देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रकल्प संचालक विनायक कोकरे यांनी केले.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत भेंडी काढणीपश्चात व्यवस्थापनाबाबत दोनदिवसीय प्रशिक्षण सेंटर ऑफ एक्सेलन्स संस्था कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव आणि किसान कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते. या वेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ राहुल घाडगे, सचिन खरमाळे, अजय कुदळे, धनेश पडवळ, संतोष इंगोले, आदित्य माने या वेळी उपस्थित होते.




**व्यवसायविषयी मार्गदर्शन करताना विनायक कोकरे.**

कोकरे यांनी 'मॅग्नेट प्रकल्पाचे फलोत्पादनातील महत्त्व आणि त्यातील संधी' यावर प्रकाश टाकला. साठवणूक, प्रतवारी, पॅकिंग, विपणन, प्रक्रिया आणि मूल्यसंवर्धनासारख्या क्षेत्रात महिलांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

डॉ. अमोल यादव यांनी मॅग्नेट प्रकल्पाबाबत शेतकरी उत्पादक संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे सांगितले.

या वेळी डॉ. बी. टी. पाटील यांनी भेंडीचे मूल्यसाखळी व्यवस्थापन आणि कीड व रोगनियंत्रणाबाबत सखोल मार्गदर्शन केले. कष्टकरी राजा शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष नवनाथ गरुड यांनी काढणीपश्चात हाताळणी व व्यवस्थापन पध्दती, विपणनबाबतचे अनुभव सांगितले.

प्रकल्पाधिकारी अजय कुदळे यांनी व्यवसायातील संधी, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विपणन व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान, आयात-निर्यात परवाने व पणन मंडळाच्या योजनांबाबत मार्गदर्शन केले. संतोष इंगोले यांनी देखील मार्गदर्शन केले. किसान कनेक्टबाबत मनीष मोरे यांनी माहिती दिली. या प्रशिक्षणास ४८ प्रतिनिधी उपस्थित होते.

My Gramin Edition Edition
Jul 21, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

Pudhari, Dt. 18/07/2024

# प्राथमिक संत्रा प्रक्रिया केंद्रासाठी प्रस्ताव पाठवा

**पुणे :** राज्य सरकारने नागपूर, काटोल व कळमेश्वर (जि.नागपूर), मोर्शी (जि.अमरावती) व संग्रामपूर (जि.बुलडाणा) येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या योजनेस मान्यता दिली आहे. त्यासाठी २० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच योजनेच्या अंमलबाजवणीकरिता येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची नियुक्ती करण्यात आली असून, योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे. पणन मंडळाने पहिल्या टप्प्यात प्रक्रिया प्रकल्पाकरिता लाभार्थी निवडीची प्रक्रिया १२ जुलै २०२४ पासून सुरू केली आहे. योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये अंदाजित खर्च ४ कोटी रुपये अपेक्षित आहे. या योजनेंतर्गत प्रकल्पाकरिता प्रथमत: लाभार्थ्यांनी १५ टक्के स्वनिधी व उर्वरित ८५ टक्के निधी बँकेकडून कर्ज स्वरूपात उपलब्ध करून प्रकल्प उभारणी पूर्ण करणे आवश्यक आहे. या प्रकल्पाकरिता प्रस्ताव मागविण्याकरिताची निविदा, मॉडेल प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या https://www.msamb. com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १ सप्टेंबर २०२४ आहे.

Agrowon, Dt. 18/07/2024

# नागपूर, अमरावती, बुलडाण्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे

## वीस कोटींचा निधी मंजूर; ‘पणन’ करणार अंमलबजावणी

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राज्य शासनाने तीन जिल्ह्यांत आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यासाठीच्या योजनेस मान्यता दिली असून, २० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. ही केंद्रे नागपूर जिल्ह्यातील काटोल व कळमेश्वर, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी, बुलडाणा जिल्ह्यातील संग्रामपूर येथे होणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.



श्री. कदम म्हणाले, ‘‘पणन मंडळाने पहिल्या टप्प्यात प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पाकरिता लाभार्थी निवडीची प्रक्रिया सुरू केली आहे. योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, खासगी उद्योजक आणि बाजार समिती यांचा समावेश आहे.’’

प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पात पॅक हाउस, संत्रा ग्रेडिंग लाइन, प्रीकूलिंग, कोल्ड स्टोअरेज आदी सुविधांचा समावेश असून, अंदाजित खर्च ४ कोटी रुपये अपेक्षित आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्पाकरिता प्रथमतः लाभार्थ्यांनी १५ टक्के स्वनिधी व उर्वरित ८५ टक्के निधी बँकेकडून कर्ज स्वरूपात उपलब्ध करून प्रकल्प उभारणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून प्रकल्पाच्या अंदाजित किमतीच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत किंवा कमाल २ कोटी रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार असून हे अनुदान लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येईल.

पान ४ वर »

Agrowon, Dt. 18/07/2024

# नागपूर, अमरावती, बुलडाणा येथे होणार आधुनिक संत्रा केंद्रे

» पान १ वरून

या प्रकल्पाकरिता प्रस्ताव मागविण्याकरिताची निविदा तसेच मॉडेल प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या https://www.msamb.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १ सप्टेंबर २०२४ आहे. या योजनेचा लाभ संबंधित तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी घ्यावा व या योजनेच्या अधिक माहितीकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या प्रकल्प विभागाशी ०२०-२५५२८१०० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्य नगरी

# संत्रा प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी मान्यता

- २० कोटी निधीची तरतूद
- प्रस्ताव मागणीबाबत कार्यवाही सुरू

**पुणे** : राज्य शासनाने नागपूर, काटोल व कळमेश्वर (जि. नागपूर), मोर्शी (जि. अमरावती) व संग्रामपूर (जि. बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे या योजनेस मान्यता दिली आहे. त्यासाठी २० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबाजवणीकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांची नियुक्ती करण्यात आली असून, योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पणन मंडळाने पहिल्या टप्प्यात प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पाकरिता लाभार्थी निवडीची प्रक्रिया १२ जुलै २०२४ पासून सुरू केली आहे. योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, खासगी उद्योजक आणि बाजार समिती यांचा समावेश आहे. प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पात पॅक हाउस, संत्रा ग्रेडिंग लाइन, प्री-कूलिंग, कोल्ड स्टोअरेज आदी सुविधांचा समावेश असून अंदाजित खर्च चार कोटी रुपये अपेक्षित आहे. या योजनेंतर्गत प्रकल्पाकरिता प्रथमतः लाभार्थ्यांनी १५ टक्के स्वनिधी व उर्वरित ८५ टक्के निधी बँकेकडून कर्ज स्वरूपात उपलब्ध करून प्रकल्प उभारणी पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून प्रकल्पाच्या अंदाजित किमतीच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत किंवा कमाल २ कोटी रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार असून, हे अनुदान लाभार्थ्याच्या कर्जखात्यावर जमा करण्यात येईल. या प्रकल्पाकरिता प्रस्ताव मागविण्याकरिताची निविदा तसेच मॉडेल प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १ सप्टेंबर २०२४ आहे.

या योजनेचा लाभ संबंधित तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी घ्यावा व या योजनेच्या अधिक माहितीकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या प्रकल्प विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

Pune_ Edition Edition
Jul 17, 2024 Page No. 11
Powered by: erelego.com

Kesari, Dt. 17/07/2024

# प्राथमिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी प्रस्ताव मागणीबाबत कार्यवाही सुरू

**पुणे :** राज्य शासनाने नागपूर, काटोल व कळमेश्वर (जि.नागपूर) मोर्शी (जि. अमरावती) व संग्रामपूर (बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे या योजनेस मान्यता दिली असून २० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांची नियुक्ती करण्यात आली असून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पणन मंडळाने पहिल्या टप्प्यांत प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पासाठी लाभार्थी निवडीची प्रक्रिया १२ जुलै २०२४ पासून सुरु केली आहे. योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादन कंपन्या, शेतकरी गट, खासगी उद्योजक आणि बाजार समिती यांचा समावेश आहे.

प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पात पॅक हाऊस, संत्रा ग्रेडिंग लाईन, प्रीकुलिंग, कोल्ड स्टोअरेज आदि सुविधांचा समावेश असून अंदाजित खर्च ४ कोटी अपेक्षित आहे. या योजनेतंर्गत प्रकल्पासाठी प्रथमतः लाभार्थ्यांनी १५ टक्के स्वनिधी व उर्वरीत ८५ टक्के निधी बँकेकडून कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन प्रकल्प उभारणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत किंवा कमाल २ कोटी रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार असून हे अनुदान लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येईल.

Agrowon, Dt. 17/07/2024

# सामुदायिक प्रयत्नांतून वाढेल केळी निर्यात

**वैयक्तिक केळी उत्पादकांसह शेतकरी उत्पादक कंपन्या, गट, समूह यांच्या सामुदायिक प्रयत्नांतून निर्यात वाढवायला पाहिजेत.**

मागील वर्षभरातील अत्यंत प्रतिकूल असे हवामान, त्यातच केळी पिकांवर करपा तसेच सीएमव्ही (कुकुंबर मोझॅक व्हायरस) रोगांचा वाढता प्रादुर्भाव, अशा परिस्थितीत राज्यातील केळी उत्पादकांनी दर्जेदार अशा निर्यातक्षम केळीचे अधिक उत्पादन घेतले. शिवाय रशिया-युक्रेन, इस्राईल-हमास यांच्यामधील युद्धामुळे जगभर तणावाचे वातावरण आहे. निर्यातीसाठी सुएझ कालवाही बंद आहे. त्यामुळे आफ्रिकेला वळसा घालून जहाजांना जावे लागत असल्याने अंतर आणि निर्यातीसाठीचा खर्चही वाढला आहे. अशा अनेक अडचणींवर मात करीत निर्यातदारांनी केळीची निर्यात वाढविली. त्यामुळे एप्रिल २०२३ ते जून २०२४ या काळात देशातून २४ हजार कंटेनर केळीची निर्यात झाली आहे. २०२२-२३ च्या तुलनेत ही निर्यात सात हजार कंटेनरने अधिक आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे देशातून होणाऱ्या एकूण केळी निर्यातीत एकट्या महाराष्ट्राचा वाटा ६२ टक्क्यांपर्यंत राहिला आहे. सोलापूर, जळगावसह राज्याच्या इतरही केळी उत्पादक पट्ट्यांतून निर्यातक्षम केळीचे उत्पादन आणि निर्यातही वाढत असल्यानेच हे शक्य झाले आहे. मागच्या वर्षी निर्यातीसाठीच्या केळीला ३००० ते ३२०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला होता. त्या तुलनेत या वर्षी मात्र निर्यातक्षम केळीचे दर निम्म्याने (प्रतिक्विंटल १४०० ते १५०० रुपये) घसरले आहेत. त्यामुळे केळी उत्पादकांच्या पदरी निर्यातीचे अपेक्षित लाभ मात्र पडले नाहीत. देशातून, राज्यातून केळीची निर्यात वाढत असली, तरी जागतिक बाजारात आपला निर्यातीचा टक्का अजूनही खूप कमी असून तो वाढविण्याची संधी आहे.

अलीकडच्या काळात केळीची कांदे आणि मृग अशा दोन्ही बागांसाठी शेतकरी 'फ्रूट केअर'अंतर्गत रोपांच्या निवडीपासून ते घड काढणीपर्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत. असे असले तरी दर्जेदार केळी उत्पादनाच्या अनुषंगाने पीक पोषण आणि कीड-रोगांचे नियंत्रण यावर खूप काम करावे लागणार आहे. केळीवरील बुरशीजन्य तसेच विषाणूजन्य रोगांचे प्रभावी नियंत्रण अजूनही होत नाही. त्यामुळे उत्पादनासह केळीचा दर्जाही घसरतो. नव्या वाणांची निर्मिती तसेच रोगमुक्त दर्जेदार उति संवर्धित केळी रोपांच्या माध्यमातून यावर उपाय शोधावा लागणार आहे. राज्यात निर्यातक्षम केळीचे उत्पादन वाढत असताना पायाभूत सुविधांच्या अभावी निर्यात वाढताना दिसत नाही. सोलापूर, जळगावसह वसमत- हिंगोली, अर्धापूर-नांदेड, शहादा-ब्राह्मणपूर-नंदूरबार, धुळे असे केळी उत्पादनांचे क्लस्टर निर्माण होत असताना ते निर्यातीचे क्लस्टर म्हणून विकसित होताना दिसत नाहीत. राज्यातील केळी क्लस्टरमध्ये निर्यातीच्या अनुषंगाने सर्व पायाभूत सुविधा जसे की रायपनिंग चेंबर, प्री-कूलिंग, पॅक हाउस, कंटेनर-रेफर व्हॅन उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. केळीची निर्यात प्रामुख्याने निर्यातदार, निर्यात कंपन्या करतात. अशा प्रकारच्या निर्यातीला मर्यादा असून, निर्यातीतील अधिक दराचा लाभ उत्पादकांपर्यंत पोहोचत देखील नाही. त्यामुळे वैयक्तिक केळी उत्पादकांसह शेतकरी उत्पादक कंपन्या, गट, समूह यांच्या सामुदायिक प्रयत्नांतून निर्यात वाढवायला पाहिजेत. आपली केळीची निर्यात प्रामुख्याने आखाती देशांत होते. फार थोडी केळी रशिया, युरोपमध्ये जाते. अशावेळी युरोपसह जगभरातील बाजारपेठांचा शोध घेऊन निर्यात वाढविण्याचे प्रयत्न उत्पादकांपासून ते केंद्र सरकारपर्यंत असे सर्वांनाच करावे लागतील. आपल्या येथील केळीला पाकिस्तानमधून चांगली मागणी असते. परंतु मागील चार-पाच वर्षांपासून दोन देशांतील बिघडलेल्या संबंधामुळे पाकिस्तानला होणारी केळीची निर्यात बंद आहे. सध्या आपली केळी इराणमधून इराक, पाकिस्तान, अफगाणिस्तान या देशांना जाते. अशावेळी पाकिस्तान सोबतचा व्यापार सुरळीत करण्यावरही भर द्यायला हवा. याकरिता अपेडासह केंद्र सरकारच्या वाणिज्य, उद्योग मंत्रालयाने प्रयत्न केले पाहिजेत. केळी निर्यातवृद्धीसाठी असे सर्वांगीनी प्रयत्न झाले पाहिजेत.

# चाळीसगाव बाजार समिती स्मार्ट प्रकल्प उभारणार
# नाशिकच्या प्रकल्प अधिकाऱ्यांकडून जागेची पाहणी



**चाळीसगाव**–जागतिक बँक अर्थसाहाय्यीत स्मार्ट प्रकल्प अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ मार्फत उभारावयाच्या निर्यात सुविधांकरीता अर्थात 'कलेक्शन सेंटर फॉर प्रायमरी प्रोसेसिंग ऑफ फ्रुट्स अँड व्हेजिटेबल्स याकरिता चाळीसगाव बाजार समितीमध्ये जागा निश्चित करण्यात आलेली आहे. या जागेची पाहणी करण्याकरिता डॉ. गणेश राख (पर्यावरण तज्ञ) विभागीय अंमलबजावणी कक्ष स्मार्ट प्रकल्प नाशिक, कृष्णा सताळे (सामाजिक विकास तज्ञ) स्मार्ट प्रकल्प नाशिक आणि हेमंत अत्तरदे (व्यवस्थापक अभियांत्रिकी) महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय नाशिक यांनी बाजार समितीस दि.१५ जुलै रोजी सायंकाळी भेट दिली. यामध्ये जागतिक बँक अर्थसहाय्यीत स्मार्ट प्रकल्प अंतर्गत अंमलबजावणी कक्ष महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ मार्फत उभारावयाच्या निर्यात सुविधांकरीता बाजार समितीकडून जागा देण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता.स्मार्ट प्रकल्पांतर्गत या ठिकाणी 'कलेक्शन सेंटर फॉर प्रायमरी प्रोसेसिंग ऑफ फ्रुट अँड व्हेजिटेबल्स' याच्यासाठी उभारणी करण्यात येणार आहे. त्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

या प्रकल्पाची उभारणी झाल्यानंतर काही प्रमाणात रोजगार प्राप्त होईल व शेतकरी बांधवांसाठी सुविधा निर्माण होईल, असे बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र राठोड यांनी सांगितले. यावेळेस डॉ. गणेश राख, कृष्णा सताळे, हेमंत अत्तरदे यांच्याबरोबरच बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र राठोड,सुनिल जमादार तसेच बाजार समितीचे सचिव जगदिश लोधे,सहाय्यक सचिव सतिश पाटील, बाजार समितीचे कर्मचारी विरेंद्र पवार, सुरेश बारेला, पांडूरंग बोराडे, मच्छिंद्र चौधरी, अरूण शिरसाठ,दिलीप चंदेले उपस्थित होते.

झझझझझझझझझझझझझझ

Agrowon, Dt. 16/07/2024

# केळी निर्यातीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर

## देशातून गतवर्षीपेक्षा सात हजार कंटेनरने निर्यात वाढली

चंद्रकांत जाधव : ॲग्रोवन वृत्तसेवा

**जळगाव : केळी निर्यातीत देशातून सतत वाढ होत आहे. एप्रिल २०२३ ते जून २०२४ या कालावधीत देशातून सुमारे २४ हजार कंटेनर (एक कंटेनर २० टन क्षमता) केळीची निर्यात झाली आहे. २०२२-२३च्या तुलनेत ही निर्यात सुमारे सात हजार कंटेनरने वधारली आहे. तर देशात केळी निर्यातीत महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे.**



इस्राईल व आखातात तणाव असल्याने निर्यातीसंबंधी अडचणी आल्या. सुएझ कालव्याऐवजी आफ्रिकेला वळसा घालून निर्यात सुरू राहिली. यात निर्यातीसंबंधी भाडेवाढ झाली. अशातही केळी निर्यात वाढली आहे. केळीची सर्वाधिक निर्यात आखातात झाली आहे.

केळी निर्यातीत महाराष्ट्राने आघाडी घेतली असून एकूण निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा ६२ टक्क्यांपर्यंत राहिला आहे. या पाठोपाठ गुजरात, आंध्र प्रदेश व केरळ येथून केळी निर्यात झाली आहे. देशात केळी लागवडीचे पॅटर्न, कालावधी बदलले आहेत.

**पान ४ वर »**

> **निर्यातक्षम केळी यंदा उन्हाळ्यात अधिकची उपलब्ध झाली. या काळात निर्यातीलाही गती आली. अनेक कंपन्यांनी निर्यातीत आघाडी घेतली. अजूनही खानदेशातून निर्यात सुरू आहे. खानदेशातून यंदा चार हजार कंटेनर केळीची निर्यात झाली आहे. देशातही केळी निर्यात २४ हजार कंटेनरपर्यंत पोचली आहे.**
>
> **– प्रेमानंद महाजन,** केळी व्यापाराचे जाणकार, जळगाव

# केळी निर्यातीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर

**» पान १ वरून**

बारमाही केळी निर्यातीसाठी उपलब्ध आहे. राज्यात केळी लागवडीत वाढ झाली नाही. परंतु दर्जेदार व निर्यातक्षम केळी अधिकची उपलब्ध होत आहे. परिणामी निर्यातीत वाढ होत असल्याची माहिती मिळाली.

राज्यातून अजूनही केळी निर्यात सुरू आहे. सर्वाधिक निर्यात सोलापूर भागातून झाली आहे. परंतु सोलापुरात उन्हाळ्यात केळी निर्यातीसाठी उपलब्ध नव्हती. या कालावधीत खानदेशात केळी अधिकची उपलब्ध झाली. रोज १०० ट्रक (एक ट्रक १० टन क्षमता) केळी मार्च ते मे या कालावधीत खानदेशात निर्यातीसाठी उपलब्ध झाली. रोज १० कंपन्या केळी निर्यातीचे काम खानदेशात उन्हाळ्यात करीत होत्या. सध्या सोलापुरात केळी उपलब्ध नाही. खानदेशातून रोज चार कंटेनर केळीची निर्यात होत आहे. तसेच देशांतर्गत बाजारातही रोज २१० ट्रकपेक्षा अधिकची केळी खानदेशातून पाठविली जात आहे.

**मागील हंगामाच्या तुलनेत दर कमी**

'कुकुंबर मोझॅक' विषाणूची समस्या एप्रिल व मे या महिन्यात लागवड केलेल्या केळी रोपांत कमी येत असल्याचे लक्षात घेऊन एप्रिल व मे २०२३ मध्ये अनेकांनी केळी लागवड केली. जून व जुलैत केळी लागवड टाळली. परिणामी यंदा मार्च व एप्रिलमध्ये निर्यातक्षम केळी अधिकची काढणीवर आली. देशांतर्गत व निर्यातीसाठी मिळून खानदेशात रोज ६०० ट्रक केळी काढणीसाठी एप्रिल व मे महिन्यात उपलब्ध होती. २०२२-२३ मध्ये निर्यातीच्या केळीला कमाल ३२०० रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. यंदा मात्र कमाल दर १६०० रुपये प्रतिक्विंटल, असा मिळाला.